**महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड**

**(पुणे मेट्रो रेल प्रकल्प)**

**काँग्रेस भवन(शिवाजी नगर) रस्त्यावर मेट्रो रेल कामाचे नियोजन करण्याकरिता महा मेट्रो आणि पुणे महानगर परिवहन महामंडळ(पीएमपीएल) अधिकाऱ्याची संयुक्त बैठक.**

पुणे ०३ : पुणे शहरात महा मेट्रोचे कार्य जलद गतीने सुरु असून लवकरच काँग्रेस भवन (शिवाजी नगर)रस्त्यावर मेट्रोचे निर्माण कार्य सुरु करण्यात येणार आहे. या मार्गावर मेट्रोचे बांधकाम करतांना कार्याचे नियोजन करते वेळी असे निदर्शनास आले कि,या मार्गावर पुणे महानगर परिवहन महामंडळ(पीएमपीएल)यांचे तीन बस मार्ग आणि ५ बस स्थानक आहेत. पुणे मेट्रोच्या कामानिमित्त टप्याटप्याने या बस स्थानकांचे स्थानंतर करावे लागणार आहे. असे केल्याने मेट्रो रेल चे निर्माण जलद गतीने करण्यास सोईस्कर ठरू शकते. या अनुषगाने महा मेट्रो आणि पीएमपीएल अधिकाऱ्यांन सोबत नुकतीच संयुक्त बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये रिच – २ चे मुख्य प्रकल्प व्यवस्थापक श्री. अतुल गाडगीळ,वरिष्ठ उप मुख्य प्रकल्प व्यवस्थापक रिच – २ श्री. धनंजय कृष्णप्पा आणि पीएमपीएल चे महाव्यवस्थापक श्री. बांदल आणि प्रबंधक श्री. माने उपस्थित होते. श्री. अतुल गाडगीळ यांनी पुणे महानगर परिवहन महामंडळ(पीएमपीएल) अधिकाऱ्यांना या मार्गिका वरील मेट्रोच्या कामाबद्दल अवगत करत व बस स्थानक स्थानांतर,ट्राफिक चे योग्यरित्या नियोजन करण्यासंदर्भात पर्याय सुचविले.

पीएमपीएमएलच्या अधिकाऱ्यांनी मुठा नदीच्या दिशेने असलेले ५ बस स्थानके पुणे महानगरपालिकेच्या इमारत समोरील जागेवर स्थानांतर करण्यास आपली सहमती दर्शवित लवकरच या ठिकाणचे बस स्थानके महा मेट्रो आणि पुणे महानगर परिवहन महामंडळ(पीएमपीएल) च्या संमन्वयाने स्थानंतर करण्यात येईल व ही बस स्थानके स्थानंतर करतांना होणारा खर्च महा मेट्रो स्वतः वहन करेल तसेच मेट्रोच्या बांधकामादरम्यान कोणतीही वाहतूक भंग होणार नाही याची खात्री करण्यासाठी "नो पार्किंग", "नो स्टॉपिंग" इत्यादी प्रकारचे फलक महा मेट्रो तर्फे लावण्यात येईल अशी ग्वाही श्री. गाडगील यांनी पीएमपीएलच्या अधिकाऱ्यांना दिली.

तसेच या मार्गिका वर मेट्रो प्रकल्पाचे निर्माण कार्य करतांना वाहतुकीचे नियोजन योग्यरीत्या व्हावे याकरिता संयुक्त पहाणी पोलीस निरीक्षक (ट्राफिक) शिवाजीनगर यांच्या सोबत लवकरच करण्यात येईल अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

महाव्यवस्थापक ( जनसंपर्क)

डॉ. हेमंत सोनावणे